# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७/ ८१४९४६७४०१** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक ७/२०२३** **दिनांक: २४ जानेवारी, २०२३** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख | नोडल ऑफिसर | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दि.१८/०१/२०२३ ते २४/०१/२०२३) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दि.२५/०१/२०२३ ते २९/०१/२०२३ स.८.३० पर्यंत वैध) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, कृषि विद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| १८/०१ | १९/०१ | २०/०१ | २१/०१ | २२/०१ | २३/०१ | २४/०१ | | २५/०१ | २६/०१ | २७/०१ | २८/०१ | २९/०१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३१.२ | ३१.८ | ३२.३ | ३०.७ | ३०.८ | २९.० | २७.० | कमाल तापमान (अं.से) | २९ | ३० | ३० | ३१ | २९ |
| ९.९ | ११.४ | ११.७ | १२.७ | ११.० | ११.२ | १०.७ | किमान तापमान (अं.से) | १६ | १७ | १६ | १५ | १४ |
| ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा) सकाळ | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | मेघाच्छादन (ऑक्टा) दुपार | | | | | |
| ९० | ८८ | ९३ | ९३ | ९३ | ९३ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७० | ७३ | ६४ | ६७ | ६८ |
| ५१ | ३६ | ४४ | ५२ | ५१ | ५२ | ६१ | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ५९ | ५४ | ५५ | ५३ | ५२ |
| २.३ | २.४ | २.६ | २.४ | २.५ | २.३ | २.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | ९ | ९ | ८ | १० |
| वा. | वा. | वा. | प. | प. | वा. | वा. | वाऱ्याची दिशा | वा.प. | आ.द. | ई.पू. | आ.द. | नै.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२३ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३५५९.५ |

## हवामान सारांश /इशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दि. २५ ते २९ जानेवारी, २०२३ दरम्यान हवामान कोरडे राहून कमाल आणि किमान तापमानात क्रमश: घट संभवत असून कमाल तापमान २९ ते ३१ अं.सें. दरम्यान आणि किमान तापमान १४ ते १७ अं.सें. दरम्यान राहील. दि. २६ जानेवारी, २०२३ दरम्यान आकाश ढगाळ राहील.** |
| **विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी, २०२३ दरम्यान हवामान कोरडे राहून कमाल तापमान हे सरासरीपेक्षा कमी आणि किमान तापमान हे सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.** |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | -- | • **तापमानात घट होण्याची शक्यता असल्याने तापमानाचा पिकाच्या वाढीवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी भाजीपाला पिके, कडधान्य पिके, रोपवाटिका तसेच बागायती पिकांना संध्याकाळच्या वेळेस पाणी दयावे जेणेकरून जमीन उबदार राहण्यास मदत होईल.** |
| **विशेष सल्ला** | -- | • **तापमानात घट होण्याची शक्यता असल्याने कोंबड्यांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळेस कोंबड्यांच्या शेडमध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब लावावेत आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे.** |
| **कडधान्य पिके** | फुलोरा अवस्था | • **वाल, चवळी पिक फुलोऱ्यात येण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति सवेंदनशील असल्याने तसेच थंडीचा ताण राहिल्याने फुलगळ होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी पिकास फुलोऱ्या अवस्थेत संध्याकाळच्या वेळेस पाणी देण्याची व्यवस्था करावी जेणे करून जमीन उबदार** |

| | | |
|---|---|---|
| | | राहण्यास मदत होईल. |
| **आंबा** | फुलोरा ते फळधारणा अवस्था | • मोहोर/फळधारणा अवस्थेतील आंब्यावर तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असते. तुडतुडे मोहोरातील, कोवळ्या फळातील रस शोषून घेतल्यामुळे मोहोराची गळ होते यासोबतच तुडतुडे मधासारखा चिकट पदार्थ शरीरावाटे बाहेर टाकतात आणि तो पानांवर पडल्यामुळे त्यावर काळी बुरशी वाढते. तुडतुड्यांनी आर्थिक नुकसानीची पातळी (पालवी/मोहोर अवस्था ->५ तुडतुडे प्रती पालवी/मोहोर) ओलांडली असल्यास कीटकनाशकाची फवारणी करण्यात यावी. यासाठी बोंगे फुटण्याच्या अवस्थेत लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रती १० लिटर पाणी, मोहोर फुलण्यापूर्वीच्या अवस्थेत इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.ली. किंवा ब्युप्रोफेझीन २५ टक्के प्रवाही २० मि.ली. प्रति १० लिटर पाणी आणि वाटाणा अवस्थेत असताना थायोमेथोक्झाम २५ टक्के दाणेदार १ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• आंबा मोहोरावर आणि फळांवर फुलकीडींचा (थ्रीप्स) प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीच्या प्रादुर्भावामुळे कोवळ्या सालीचा भाग खरवडल्यामुळे तो भाग काळा पडतो, पाने वेडीवाकडी होतात व नंतर गळून पडतात. मोहोराचे दांडे खरवडल्यासारखे दिसतात व मोहोर काळा पडून गळून जातो. प्रादुर्भाव दिसून येत असल्यास फुलकीडींच्या नियंत्रणासाठी ४५ टक्के स्पीनोसॅड २.५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून संपूर्ण झाडावर फवारावे.<br>• मोहोर अवस्थेत असलेल्या आंब्यामधील परागीकरण वाढविण्यासाठी मोहोर फुललेल्या अवस्थेत असताना सकाळच्या वेळेस (सकाळी ९ ते १२ वा.) हलका हलवून घ्यावा. फळधारणा झालेल्या झाडावरील मोहोरातील सुकलेल्या अवस्थेतील नर फुले दुपारच्या वेळेस कडक उन्हामध्ये झाडून घेतला असता किड व रोगाचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते, कीटकनाशकाची फवारणी अधिक प्रभावशाली होवून फळांची वाढ चांगली होते.<br>• **टीप: मोहोर नुकताच फुलत असताना ते फलधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी शक्यतो टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी परागीकरणाचा कालावधी वगळून (सकाळी ०९.०० ते १२.००) फवारणी करावी. किटकनाशक किंवा बुरशीनाशकाची फवारणी शक्यतो सकाळी किवा संध्याकाळच्या वेळेस करावी.**<br>• या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून येत असल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• **आंब्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी व आणि प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची (१० ग्रॅम प्रति लिटर पाणी) फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना अशा एकूण तीन फवारण्या कराव्यात.**<br>• तापमानातील बदलामुळे फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये, वाटाणा ते सुपारी आकारांच्या फळांची होणारी गळ कमी करण्यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार आठवड्यातून एकदा १०० लिटर पाणी प्रति झाड किंवा १५ दिवसातून एकदा १५० ते २०० लिटर पाणी प्रति झाड या प्रमाणात फळे वाटाणा आकारापासून ते सुपारी आकाराची होईपर्यंत द्यावे.<br>• आंबा फळांचे फळमाशी पासून तसेच प्रखर सूर्यकिरणांपासून संरक्षण करण्यासाठी तसेच फळांचा आकार व वजन वाढून डाग विरहीत फळांसाठी, गोटी ते अंडाकृती आकाराच्या आंबा फळांना डॉ.बा.सा.कों.कृ.विद्यापीठाने दिलेल्या शिफारशी नुसार २५ x २० सें.मी. आकाराच्या कागदी/ वर्तमानपत्रापासून बनविलेल्या पिशव्यांचे आवरण घालावे. आवरण घालताना फळाच्या देठाकडे इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. |
| **काजू** | फुलोरा ते फळधारणा अवस्था | • फुलोरा ते फळधारणा अवस्थेतील काजूवर मावा आणि ढेकण्या (टी मोस्कीटो बग) किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. हि कीड मोहोरातील/फळातील रस शोषून घेते तसेच पिल्ले आणि प्रौढ यांची लाळ ही फायटोटॉक्सिक असल्याने पालवी/मोहोर सुकून जातो, मोहोराच्या दांड्यावर काळे डाग दिसून येतात. फळांची गळ दिसून येते. मावा किटक अंगातून मधासारखा गोड पदार्थ बाहेर टाकतात आणि त्यावर मुंग्या आर्कषित होताना दिसून येतात. किडीच्या नियंत्रणासाठी **मोहोर फुटण्याच्यावेळी** प्रोफेनोफोस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. आणि |

| | | |
|---|---|---|
| | | **फळधारणेच्या वेळी** लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पानांच्या खालून आणि वरून व्यवस्थित बसेल अशी करावी. फवारणी शक्यतो सकाळी १०.०० पूर्वी किंवा संध्याकाळी ४.०० नंतर करावी. (टीप: किटकनाशकास लेबल क्लेम नाहीत). एकाच कीटकनाशकाची सलग फवारणी घेणे टाळावे.<br>• काजू पिकाची फळधारणा व उत्पन्न वाढविण्यासाठी स्वस्त अशा सुकविलेल्या माशांचा अर्क ५०० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फुले येताना पहिली फवारणी व पहिल्या फवारणीनंतर १० दिवसांनी दुसरी फवारणी करावी.<br>• फळधारणा अवस्थेतील काजूवर बोंड आणि बी पोखरणाऱ्या अळीच्या प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीची अळी बी व बोंडावरील भाग खरवडून त्याच्यावर आपली उपजीविका करते. त्यानंतर अळी बी व बोंडामध्ये प्रवेश करून आपला प्रवेश मार्ग विष्टेच्या सहाय्याने बंद करते. अळीच्या नियंत्रणासाठी प्रोफेनोफोस १५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **कलिंगड** | फळधारणा अवस्था | • कलिंगड पिकामध्ये नाग अळीच्या प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून अळी पानाच्या आत शिरून आतील भाग खाते त्यामुळे पानावर नागमोडी रेषा दिसून येतात. प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी ४ टक्के निबोळी अर्क किंवा कडूनिंबयुक्त कीटकनाशक अझाडीरेक्टीन (१० हजार पीपीएम) २० मि.ली. किंवा डायमेथोएट १५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• कलिंगड पिकामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असते. यामुळे प्रादुर्भावग्रस्थ फळे पूर्ण वाढ न होता गळून पडतात, काही फळे वेडीवाकडी वाढून गळून पडतात. फळमाशीच्या नियंत्रणासाठी पिकामध्ये पिकामध्ये फुले येण्यास सुरुवात झाल्यापासूनप्रती एकरी दोन ‘क्यु ल्युर’ रक्षक सापळे लावावेत. वेळोवेळी किडग्रस्त फळे गोळा करून नष्ट करावीत. |
| **मिरची** | वाढीची ते फुलोरा अवस्था | • मिरची पिकावर फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडी पानातील रस शोषून घेतल्याने मिरचीची पाने सुरकुतून त्यांची वाढ खुंटते. प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी फिप्रोनील ५ टक्के प्रवाही १६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी सकाळी किंवा संध्याकाळी पानांच्या दोन्ही बाजूस बसेल अशी करावी. तसेच पिकामध्ये निळया रंगाचे चिकट कागदाचे सापळे लावावेत. हलके पाणी देत असलेल्या मिरची पिकामध्ये फुलकिडीच्या नियंत्रणासाठी वर्टीसिलीयम लेकॅनी किंवा ब्युवेरियाची ५ ग्रॅम किंवा ५ मि.ली. प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **कुकुटपालन** | -- | • कोंबड्यांचे थंडीपासून संरक्षणासाठी रात्रीच्या वेळेस कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब लावावेत आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे. |
| **पशुसंवर्धन** | -- | • करडांना थंडीपासून संरक्षणासाठी रात्री उष्णतेसाठी गरजेनुसार विजेचे बल्ब लावावेत. |
| **मत्स्यसंवर्धन** | -- | • थंडीचे प्रमाण अधिक असल्यास सकाळी आणि रात्री उशिरा देण्यात येणारे खाद्याचे प्रमाण नेहमी पेक्षा कमी द्यावे. खाद्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी “”खाद्य चेक ट्रे”चा वापर करावा.<br>• सकाळी धुक्याचे प्रमाण वाढल्यास तलावातील प्राणवायूचे प्रमाण कमी होवू शकते. यासाठी उपलब्ध एरीएटर किंवा पाण्याच्या पंपाच्या सहाय्याने पाणी हलवावे किंवा बांबूच्या काठीने पाणी झोडपावे, जेणेकरून पाण्यातील विद्राव्य प्राणवायूचे प्रमाण वाढण्यास मदत होईल. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.
अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र, कृषी विज्ञान केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.